

शासकीय-निमशासकीय कार्यालयातील कोणत्याही पदाच्या नोकरीसाठी उपयुक्त नव्हे तर अनिवार्य असा MPSC च्या सर्व पोस्टसाठी लागू असलेला
शासकीय कॉम्प्युटर टायपिंग कोर्स
महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त : अधिकृत प्रशिक्षण केंद्र
* क्लासची वैशिष्टये *
। महाराष्ट्र शासनाचे अधिकृत प्रमाणपत्र
। सुसज्ज कॉम्प्युटर लॅब
। गरजू विद्यार्थ्यांसाठी माफक फी
विघ्नहर कंम्प्यूटर
अधिक माहितीसाठी संपर्क
धोंडे पाटील कॉम्प्लेक्स, गोकुळ कॉलनी, कॉलेज रोड, राहुरी
98 60 87 29 18 ☎ : 02426-295118



सायं. दैनिक
# सार्व मंथन
नवी दिशा, नवी आशा
मुख्य संपादक : अनिल कोळसे, मो. ९८२२५४४०७२
इंटरनेट आवृत्ती : गुगल वर पहा
www.sarvmanthan.in



श्रीयांश इंटरप्राईजेस
गिफ्ट गॅलरी, मोबाईल रिपेरिंग व ॲक्सेसरीज, ऑनलाईन सर्व्हिसेस
सर्व प्रकारचे इन्शुरन्स योग्य दरात करून मिळतील.
■ सीसी टी.व्ही. ■ इन्व्हर्टर बॅटरीची विक्री-दुरुस्ती व होम सर्व्हिस
■ सर्व प्रकारचे ऑनलाईन फॉर्म व शासकीय योजनेचे फॉर्म भरून मिळतील.
पत्ता : सुभक्ती कॉम्प्लेक्स, कुलकर्णी हॉस्पिटलच्या मागे, शुक्लेश्वर रोड, राहुरी, जि. अहिल्यानगर
संपर्क : ८७९३०९५०५०



। अहिल्यानगर । वर्ष ५ वे । अंक २३८ वा । मंगळवार, १४ एप्रिल २०२६ । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MAH/MAR/2016/72596 । sarvmanthan16@gmail.com ।





महामानवास विनम्र अभिवादन

## राहुरीत त्वरित विकणे आहे.

राहुरी शहरातील मल्हारवाडी रोड भागीरथीबाई कॉलनी येथे पूर्व व पश्चिम दोन्ही बाजूने रस्ता असलेली १७५० स्के जागेत आर सी सी ३१०० स्के फुट बांधकाम तिन मजली बेल्डिंग त्वरित देणे आहे. पहिला मजला हॉल, किचन, दोन बेडरूम, संडास, बाथरूम, दुसऱ्या मजल्यावर सेम, तिसऱ्या मजल्यावर एक रूम संडास बाथरूम
संपर्क - ९८२२५४४०७२ / ९०२८००४०७२

## वाहन चालक पाहिजे.

न्यु. अर्बनिया चारचाकी गाडीवर वाहन चालक पाहिजे जड वाहन परवाना TR, बॅच बिल्लासह, धार्मिक स्थळे माहिती असलेला, आकर्षक वेतन दिले जाईल. त्वरीत संपर्क साधावा.
संपर्क - ९८८१३३११९३


# चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना

**मुंबई**
सार्व मंथन । वृत्तसंस्था

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी मुंबईतील चैत्यभूमी तसेच इतर स्मारक परिसरात अभिवादनासाठी भीम अनुयायांचा जनसागर उसळला. पहाटेपासूनच राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो अनुयायी स्मारकस्थळी दाखल होत असून, संपूर्ण परिसर 'जय भीम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमर रहे'च्या घोषणांनी दुमदुमून गेला आहे.



राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्यासमवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज चैत्यभूमी, दादर येथे महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले. यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, मंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री ॲड. आशिष शेलार, मंत्री संजय शिरसाट, मंत्री छगन भुजबळ, मुंबईच्या महापौर रितू तावडे आदी उपस्थित होते.

यंदाच्या जयंतीनिमित्त स्मारक परिसर आकर्षक रोषणाई, फुलांची सजावट आणि विविध सामाजिक संदेश देणाऱ्या फलकांनी सजविण्यात आला आहे. अभिवादनासाठी आलेल्या नागरिकांमध्ये युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांचाही मोठा सहभाग दिसून येत आहे. अनेक अनुयायी हातात निळे झेंडे, बाबासाहेबांचे फोटो आणि संविधानाच्या प्रती घेऊन उपस्थित राहिले.

स्मारक परिसरात पोलिसांकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला असून, वाहतूक नियंत्रणासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, वैद्यकीय मदत, स्वयंसेवकांची मदत केंद्रे आणि मार्गदर्शन कक्ष उभारण्यात आले आहेत.

स्मारक परिसरात शिस्तबद्ध पद्धतीने अभिवादन सुरू असून, नागरिक मोठ्या श्रद्धेने बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत आहेत.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील तापमानात वाढ

## नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी : गिते



**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये हवामान उष्ण व दमट राहील. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी कोरडे हवामान वर्तविण्यात आले असून गेल्या दोन–तीन दिवसांपासून तापमानात काही प्रमाणात वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचे मानवी व प्राण्यांच्या आरोग्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

उष्माघाताची लक्षणे दिसताच नागरिकांनी तत्काळ डॉक्टरांशी संपर्क साधावा. आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी १०७७, १०२, १०४, १०८ व ११२ या क्रमांकांवर संपर्क करावा. नागरिकांनी तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाने पुरेसे पाणी प्यावे. शरीरातील पाणी कमी होऊ नये म्हणून ओ.आर.एस., लस्सी, ताक, कैरीचे पन्हे व लिंबू पाण्याचा नियमित वापर करावा. दुपारी बारा ते तीन वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळावे. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री वा टोपीचा वापर करावा. तसेच ओल्या कपड्याने पान २ वर

# निवडणुकीत गाफील राहिलो तर कार्यक्रम लागतो : डॉ. विखे

## वांबोरीत भाजप महायुतीची बैठक; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**राहुरी**
सार्व मंथन । विशेष प्रतिनिधी

राहुरी – पाथर्डी – नगर विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भाजप महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारार्थ वांबोरी येथे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीला वांबोरी परिसरातील शेतकरी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, निवडणुकीत गाफील राहिलो की कार्यक्रम लागतो. याचे जिवंत उदाहरण म्हणजे संगमनेर होय. या ठिकाणी सेतूवाला आमदार होतो, पण माझाही कार्यक्रम लोकांनी फिट केला. त्या निवडणुकीत कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे काम केले, मात्र जनता ऐकायला तयार नव्हती.

ते पुढे म्हणाले की, त्या निवडणुकीत 'हिरा' निवडून आला. तो इतका तेजस्वी आहे की जिल्ह्यातील कुठल्याही प्रकरणात त्याचे नाव येते. आता खरातील प्रकरणातही त्याचे नाव दिसते. मला पाडले नसते तर मी संगमनेर, नेवासा, पारनेर या विधानसभा निवडणुकीत गेलो नसतो. मला पाडण्यासाठी मोठे रिंगण लावले गेले आणि ते यशस्वी झाले.

आपल्या खासदारकीच्या काळातील कामांचा उल्लेख करत ते म्हणाले, माजी खासदार असताना लोकांनी मला मोठे प्रेम दिले. त्यामागचे कारण म्हणजे विकासाची कामे.

वांबोरी परिसराच्या विकासाबाबत त्यांनी सांगितले की, येथील युवकांसाठी क्रीडा संकुल उभारण्यात येणार असून या माध्यमातून चांगले खेळाडू तयार होतील. वांबोरी चारी टप्पा एकचे नूतनीकरण पूर्ण झाले असून टप्पा दोनचे कामही मार्गी लावले जाणार आहे. तसेच वांबोरी येथील जुनी शासकीय चारी सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जातील. या भागातील शेती सिंचनाखाली आणण्याचेही नियोजन आहे.

ते पुढे म्हणाले, आम्ही खोटे आश्वासन देत नाही. गेली चाळीस वर्षे साकळाई पाणी योजना होणार पान २ वर

# राहुरी तालुक्यात आंबेडकर जयंतीनिमित्त मद्यविक्री बंद

## राहुरी पोलिस अधिकाऱ्यांचे आदेश

**राहुरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवानिमित्त राहुरी शहर व तालुक्यात मोठ्या प्रमाणावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी राहुरी पोलिस स्टेशनने तालुक्यातील सर्व देशी–विदेशी मद्यविक्री दुकाने दि. १४ एप्रिल २०२६ रोजी बंद ठेवण्याचे आदेश जारी केले आहेत.

राहुरी पोलीस स्टेशनकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता आणि सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ मधील कलम १४२ (२) अंतर्गत हा आदेश लागू करण्यात आला आहे.

या आदेशामुळे राहुरी तालुक्यातील सर्व परवानाधारक देशी व विदेशी मद्यविक्री दुकाने संबंधित दिवशी पूर्णपणे बंद राहणार आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

स्थानिक प्रशासनाने नागरिकांना शांततेत आणि उत्साहात जयंती साजरी करण्याचे आवाहन केले आहे.

# नगर - कल्याण रोडवर भिषण अपघात

## ११ जण जागीच ठार



**कल्याण**
सार्व मंथन । वृत्तसेवा

कल्याण – अहिल्यानगर महामार्गावरील रायते पुलावर काल सकाळी मृत्यूने भीषण झडप घातली. एक सिमेंट मिक्सर ट्रक आणि इको टॅक्सीमध्ये झालेल्या समोरासमोर धडकेत तब्बल ११ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. या अपघातात इको गाडीचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे.

प्रवासी वाहतूक करणारी काळी–पिवळी इको टॅक्सी कल्याणहून मुरबाडच्या दिशेने जात होती. रायते पुलावर एका बाजूच्या रस्त्याचे काम सुरू असल्याने दोन्ही बाजूची वाहतूक एकाच मार्गिकेवरून सुरू होती. पुलावर ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात ही टॅक्सी समोरून येणाऱ्या सिमेंट मिक्सर ट्रकला प्रचंड वेगाने धडकली. धडक इतकी भीषण होती की टॅक्सीतील एकाही प्रवाशाला वाचवता आले नाही.

मृतांची नावेः भूषण घोरपडे (४९, महसूल अधिकारी), प्रशांत चेंदने (२१, टॅक्सीचालक), नेहा मोपे (१९), मानसी मोपे (२२), प्रथमेश मोपे (१५), दीपक गवळी (२६), जिजाबाई केंबारी (६०), अनंता पवार (६०), हेमंत गुरव (४५), गणपती मदे अशी आहेत.

कोरपगाव नजीक झालेल्या भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे.

## निळ्या सूर्या

सदोदित येत राहते
बाबासाहेब आठवण
कामगारा दिलेकिती
भरगच्च ती साठवण

घटीत हो कामगार
योग्य वेळी आंदोलन
केलेले उचीत कानून
आहोत सुखी म्हणून

माल्यार्पण करी तुज
उपकार तव जाणून
लिंग भेद मुळी नको
सकला समान वेतन

महिलांना प्रसुती रजा
बदलले तया प्रांक्तन
सेवा योजना संस्थान
उघडले नवीन दालन

बेकारां सार्थ रोजगार
दिल्या शब्दांचे पालन
औद्योगिक परिषदही
भिमाने केली स्थापन

अन्याय विरोधी लढा
चालू केल्या युनियन
योग्य मोबदला घामास
तुज मुळे सार्थ सपान

जगतोयं सुखी जीवन
रोजगार मिळे साधन
महा मानवा धन्यवाद
अभिनंदन अभिवादन

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

## मुख्यमंत्री सहाय्यता ऑनलाईन प्रणाली होणार सुरु

सार्व मंथन ✍ मुंबई । राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य अधिक वेगात मिळणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्यावत ऑनलाईन प्रणाली सुरू होणार आहे. या प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहेत. त्यामुळे रुग्णाला कोणत्याही प्रकारचा अर्ज भरावा लागणार नाही. त्यामुळे उपचार प्रक्रियेला गती मिळणार आहे. या प्रणालीचे येत्या काही दिवसातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार आहे अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षा कडून देण्यात आली आहे.




ARTI
अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई
महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत संस्था
महामानव भारतरत्न
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांना १३५ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन
"सामाजिक समता सप्ताह २०२६"
• संशोधन विभाग (अधिछात्रवृत्ती)
• विस्तार व सेवा विभाग (प्रकाशन व प्रसिद्धी)
• योजना विभाग - (यूपीएससी, एमपीएससी, आय.बी.पी.एस, पोलीस व मिलिटरी भरती, जेईई, नीट)
• कौशल्य विकास व क्षमतादृद्धी कार्यक्रम
• लेखा विभाग
• आस्थापना विभाग
@maha_arti
Maha Arti
maha_arti_
maha_arti_



## संपादकीय...

मो. ९८२२५४४०७२

# समतेचा महामंत्र डॉ. आंबेडकर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय इतिहासातील असे व्यक्तिमत्त्व आहे, ज्यांनी केवळ एका पिढीचे नव्हे तर अनेक पिढ्यांचे भविष्य घडवले. त्यांचे जीवन हे संघर्ष, विद्वत्ता, आत्मसन्मान आणि सामाजिक क्रांतीचे अद्वितीय उदाहरण आहे. भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार म्हणून त्यांनी देशाला असा भक्कम पाया दिला, ज्यावर आजची लोकशाही, सामाजिक न्याय आणि समानतेची इमारत उभी आहे. बाबासाहेबांनी आयुष्यभर जातीय विषमता, अस्पृश्यता, सामाजिक अन्याय आणि मानवी अपमानाविरुद्ध लढा दिला. समाजातील वंचित, शोषित आणि दुर्लक्षित घटकांना सन्मानाने जगण्याचा हक्क मिळावा, यासाठी त्यांनी कायदा, शिक्षण आणि संघटन या तीन शक्तींवर भर दिला. म्हणूनच त्यांनी दिलेला शिका, संघटित व्हा, संघर्ष करा, हा संदेश आजही समाजपरिवर्तनाचा सर्वात प्रभावी मंत्र मानला जातो. शिक्षण हे गुलामगिरीतून मुक्तीचे शस्त्र आहे, हा त्यांचा विचार आजच्या तरुणाईसाठी तितकाच प्रेरणादायी आहे. भारतीय राज्यघटनेत त्यांनी समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवले. संविधानातील मूलभूत हक्क, अस्पृश्यतेचे उच्चाटन, भेदभावावरील बंदी, महिलांचे हक्क, अल्पसंख्याकांचे संरक्षण आणि आरक्षणासारख्या सामाजिक न्यायाच्या तरतुदी या बाबासाहेबांच्या दूरदृष्टीचे जिवंत उदाहरण आहेत. त्यांनी लोकशाहीला केवळ मतदानापुरते मर्यादित न ठेवता ती सामाजिक जबाबदारी, नैतिकता आणि नागरिकांच्या कर्तव्यांशी जोडली. आज देशातील प्रत्येक नागरिकाला मिळणारा सन्मान, न्यायालयात मिळणारा न्याय आणि अधिकारांची हमी ही त्यांच्या विचारांचीच देण आहे. आजच्या काळात विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक प्रगती होत असताना समाजात अजूनही जातीयतेचे विष, शिक्षणातील असमानता, बेरोजगारी, महिलांवरील अन्याय आणि सामाजिक भेदभाव कायम आहे. अशा वेळी बाबासाहेबांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेली संवैधानिक नैतिकता, म्हणजेच कायद्याचा सन्मान, लोकशाही संस्थांचा आदर आणि व्यक्तिपूजेपेक्षा तत्त्वांना प्राधान्य, ही आजच्या राजकीय आणि सामाजिक वातावरणात अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी दिलेल्या चेतावण्या आजही तितक्याच लागू पडतात. लोकशाही टिकवायची असेल तर समाजात समता आणि बंधुता रुजवावी लागेल. बाबासाहेब हे केवळ सामाजिक क्रांतिकारक नव्हते, तर ते महान अर्थतज्ज्ञ आणि दूरदृष्टीचे राष्ट्रनिर्मातेही होते. भारताच्या आर्थिक धोरणांमध्ये, वित्त आयोगाच्या संकल्पनेत आणि रिझर्व्ह बँकेच्या पायाभूत विचारांत त्यांचे मोठे योगदान मानले जाते. कामगारांचे हक्क, महिलांसाठी प्रसूती लाभ, कामाचे निश्चित तास, वेतनातील समता अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी क्रांतिकारी भूमिका घेतली. त्यामुळे त्यांचे कार्य केवळ संविधानापुरते मर्यादित न राहता आधुनिक भारताच्या प्रत्येक क्षेत्राला दिशा देणारे ठरले. आज बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. मात्र केवळ मिरवणुका, प्रतिमांना हार आणि घोषणाबाजी यापुरते त्यांचे स्मरण मर्यादित राहू नये. त्यांच्या विचारांचा वारसा कृतीत उतरवणे, शिक्षणाचा प्रसार करणे, भेदभावाविरुद्ध उभे राहणे आणि संविधानिक मूल्यांचे रक्षण करणे, हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ नाव नाही, तर भारताला समतेचा, स्वाभिमानाचा आणि न्यायाचा मार्ग दाखवणारी अखंड विचारधारा आहे. त्यांच्या विचारांचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक मनापर्यंत पोहोचला, तरच भारत खऱ्या अर्थाने समतामूलक, लोकशाहीवादी आणि प्रगत राष्ट्र बनेल.

# श्रीरामपूरमध्ये विराट हिंदू संमेलन

## अन्यायाविरोधात हिंदू समाजाने संघटित व्हावे : डॉ. जयंतीभाई भाडेसिया




**श्रीरामपूर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त श्रीरामपूर येथील थत्ते मैदानावर आयोजित विराट हिंदू संमेलनात हिंदू समाजाच्या संघटनाचा आणि संस्कार संवर्धनाचा जोरदार उच्चार करण्यात आला. देश स्वतंत्र झाला असला तरी समाज संस्कारांपासून दूर गेला, अन्यायाविरोधात उभे राहण्याचे सामर्थ्य निर्माण करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्र संघचालक डॉ. जयंतीभाई भाडेसिया यांनी केले.

संमेलनाला श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास, अयोध्या यांचे कोषाध्यक्ष तथा श्रीकृष्ण जन्मभूमी न्यास मथुरा उपाध्यक्ष गोविंद गिरीजी महाराज, सरला बेटाचे महंत रामगिरी महाराज, तसेच अध्यक्षस्थानी उद्योजक बाबासाहेब काळे पाटील उपस्थित होते.

डॉ. भाडेसिया यांनी भारतमाता गुलामीतून मुक्त करण्यासाठी हिंदू समाजाने केलेल्या संघर्षाचा उल्लेख करत डॉ. केशवराव हेडगेवार, बिरसा मुंडा, संत रोहिदास महाराज, भगवान श्रीराम आणि भगवान श्रीकृष्ण यांच्या विचारांनी समाजाला दिशा दिल्याचे सांगितले. भारतीय संस्कृतीचा प्रभाव जगभर वाढत असताना आपणच आपल्या संस्कारांपासून दूर जात आहोत, ही चिंतेची बाब आहे, असे त्यांनी नमूद केले.

समाज शक्तिशाली असेल तर देश शक्तिशाली होतो. संकटाच्या काळात शासन एकटे पुरेसे ठरत नाही, समाजाने पुढे यावे लागते, असे सांगत त्यांनी हिंदू समाजाने संघटित होण्याचे आवाहन केले.

निसर्गपूजा, वृक्षारोपण, जलसंवर्धन आणि परंपरांचे जतन ही हिंदू जीवनपद्धतीची वैशिष्ट्ये असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. महंत रामगिरी महाराज यांनीही आपल्या भाषणात संस्कारांचा अभाव ही गंभीर समस्या असल्याचे सांगितले. देश स्वतंत्र होऊन दशके लोटली, तरी समाजात अन्यायाच्या घटना घडत आहेत. अन्यायाला प्रतिकार करण्याची ताकद निर्माण करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. तरुण पिढी जागृत होत असली तरी ही जागृती अपुरी असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

समाजाने संघटित होऊन धर्म, संस्कृती आणि राष्ट्ररक्षणासाठी पुढे यावे, असा संदेश देत संमेलनात सामाजिक समरसतेचा आणि राष्ट्रनिर्माणाचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

संमेलनाला विविध संत-महंत, वारकरी संप्रदायातील प्रतिनिधी, विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी, हिंदुत्ववादी कार्यकर्ते, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महामानवांचे स्मृतिस्थाने ही आपली तीर्थक्षेत्रे असावीत : डॉ. नागेश गवळी

**नेवासा**
सार्व मंथन । प्रतिनिधी



महात्मा जोतीराव फुले यांचे शिक्षण समाजाला चिकित्सा करायला लावणारे होते. महामानवांची स्मृतिस्थळे ही आपली तीर्थक्षेत्रे असावीत आणि महापुरुषांना जात नव्हे तर विचार म्हणून स्वीकारले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. नागेश गवळी यांनी केले.

कुकाणे (ता. नेवासा) येथे जाणता राजा ग्रुप, सावता परिषद व समता परिषद यांच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यगौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आमदार पांडुरंग अभंग होते.

या प्रसंगी बालब्रह्मचारी महंत आवेराज महाराज, प्रशांत शिंदे, मच्छिंद्र गुलदगड, रावसाहेब जावळे, लताताई अभंग, दत्तात्रय काळे, रामदास गोल्हार, डॉ. श्रुती आमले पाटील, नामदेव उंडे, दिनकर गर्जे, एकनाथ कावरे, अमोल अभंग, भाऊसाहेब सावंत, मोहनराव गायकवाड, प्रा. श्रीहरी तांबडे, भैरवनाथ भारस्कर, ॲड. नीरज नांगरे, संजय पवार, मच्छिंद्र म्हस्के, मच्छिंद्र कावरे, श्रीधर कासार आदी उपस्थित होते.

पुरस्कार स्वीकारताना ॲड. सुमतीताई घाडगे पाटील यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. पत्रकार विकास अंत्रे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. सुनील गर्जे यांनी, तर स्वागत राहुल जावळे यांनी केले. कार्यक्रमासाठी ॲड. गणेश निकम, डॉ. गणेश आर्ले, सुभाष चौधरी, राजेंद्र बागडे, अभिजित लुनिया, इनुसभाई नालबंद, मनोज हुलजूते, समीर पठाण, सिद्धार्थ कावरे, राजेंद्र खराडे, कुणाल धाडगे, जवाहर भंडारी, अशोक भुमकर, जावेद शेख, विलास लिपणे यांनी परिश्रम घेतले.

ॲड. सुमतीताई घाडगे (शैक्षणिक), विकास अंत्रे (साहित्य), अक्षय बोराडे (सामाजिक), मतीन भोसले (सामाजिक), विजय देशमुख (कृषी), फुलचंद रोकडे (सामाजिक), रावसाहेब मगर (सामाजिक) यांचा गौरव करण्यात आला.

## राहुरी फॅक्टरीत भाजपाच्यावतीने

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त दीपोत्सव

**राहुरी फॅक्टरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

येथील प्रसादनगर येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ १३५ व्या जयंतीनिमित्त पूर्वसंध्येला दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी पुतळा परिसर विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता. स्मारकाभोवती दिवे लावून अभिवादन केले व बाबासाहेबांच्या विचारांना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाला भाजपाचे प्रदेश कार्यालयाचे प्रभारी व उत्तर महाराष्ट्र संघटन मंत्री रवी अनासपुरे, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सत्यजित कदम, भाजपा जिल्हा सरचिटणीस अमोल भनगडे, श्री.म्हस्के यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी उपनगराध्यक्ष बेबी बर्डे, भाजपा गटनेते तथा नगरसेवक प्रकाश संसारे, प्रिती कदम, अमोल कदम, अजित चव्हाण, वसंत कदम, बाळासाहेब लोखंडे, सौरभ मुसमाडे, ऋषभ लोढा, सुजाता कदम, सीमा देठे, सिंधुताई वाळुंज, सुवर्णा कोठुळे, मनीषा कदम, चंदाराणी गाडे, आशा चव्हाण, जयश्री खांदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमास प्रा. सुधाकर कदम, सचिन सरोदे, संजय बर्डे, संतोष झावरे, केदारनाथ चव्हाण, सचिन कोठूळे, डॉ.प्रवीण कोठुळे, मोहसीन शेख, गणेश तांबे, शरद साळवे, शंकर धोत्रे, किरण पंडित, प्रकाश खुळे, मयूर कदम, संभाजी शिंदे, आशु सांगळे आदींसह भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. आंबेडकर जयंती व महात्मा फुले जयंतीनिमित्त

# राहुरीत रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतिने उपक्रम

**नेवासा**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सामाजिक समरसता व सामाजिक सद्भाव कार्य यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन १४ एप्रिल रोजी राहुरीत करण्यात आले होते.

राहुरी शहरातील शनि मंदिरात या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक व तरुणांनी शिबिरात रक्तदान केले. विशेषतः तरूण वर्गाचा यात समावेश राहिला.

यावेळी नगर येथील जनकल्याण रक्त केंद्राचे डॉक्टर शुभदा देशपांडे, जनसंपर्क अधिकारी शरद बळे, प्रियंका आढागळे, मनीषा जोशी, सुलभा, बाळासाहेब खरपुडे यांनी या रक्तदान प्रक्रियेत सहभाग घेतला. जनकल्याण रक्त केंद्राचे जनसंपर्क अधिकारी शरद बळे यांनी सांगितले की, हे रक्त केंद्र ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालते. थॅलेसिमिया रुग्णांना रक्त केंद्राच्या वतीने १५० रुग्णांना मोफत रक्तपुरवठा करते. अधिकाधिक रक्तदात्यांनी रक्तदान शिबिरात सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.




## राहुरीत जागा भाडोत्री देणे आहे

नगर मनमाड रोड हॉटेल आकाश शेजारी जोगेश्वरी आखाडा जवळ पाच गुंठे चे शेड व पडवी व मोकळी जागा भाडोत्री देणे आहे.
संपर्क :- मोबाईल नंबर ९४२२०२१०२६ (११ मार्च)

## मुळव्याध, मुतखडा व भगंदर त्वचारोग आयुर्वेदिक औषधाने बरा

मुळव्याध रक्त पडणे, कोंब, आग होणे, भगंदर, शौचास त्रास तसेच मुतखडाचे सर्व आजारावर-आयुर्वेदिक औषध मुतखडा (किडनी स्टोन) १ एमएम ते ४० एमएमचे-खडे औषधाने विरघळतात. पोट, कंबर, गुडघे दुखणे यावर आयुर्वेदिक रामबाण
औषध ऑपरेशनची गरज नाही, त्वचा रोग संबंधी सर्व औषध उपलब्ध आयुर्वेदिक बरे झालेले पेशंटचे व्हिडिओ पहायला मिळेल.
संपर्क-अशोकराव पालवे वांजुळपोई, ता. राहुरी मो. नं. ९३७०५०४७७६ (०३ डिसेंबर)

## राहुरीत गाळे भाडोत्री देणे आहे

राहुरी मार्केट यार्ड मधील शेतकरी भवन मागे एक हॉल ४९ बाय ३४ व ११ बाय ३४ चे गाळे भाडोत्री देणे आहे. तरी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
संपर्क-९४०४५३९७०७, ९८८१७६०३२४ (०६ डिसेंबर)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 13.4.26
कल्याण - राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन बाजार

Date : 13.4.26

| | | | |
|---|---|---|---|
| 1 128 245 489 | 6 259 358 457 | 3 120 247 256 | 8 170 279 567 |
| 2 237 390 679 | 7 160 269 368 | 4 239 347 356 | 9 180 289 478 |
| 3 580 670 689 | 8 350 369 459 | 5 140 249 348 | 0 235 370 578 |
| 4 130 239 347 | 9 126 234 469 | 6 259 358 457 | 1 290 380 470 |
| 5 168 690 780 | 0 190 389 569 | 7 278 250 890 | 2 138 147 156 |
| 6 367 349 790 | 1 290 380 470 | 8 125 189 459 | 3 148 346 689 |

कायमचा मेंबरसाठी संपर्क साधा (अंकशास्त्रावर आधारित दुर उपयोग करु नये)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 13.4.26
कल्याण राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन मुंबई

100% Date Fix FREE GAME Open to Close

| सोमवार ते मंगळवार | बुधवार ते गुरुवार |
|---|---|
| 4 338 699 9 388 144 | 5 366 447 0 118 299 |
| 40 - 45 x 90 - 95 | 51- 56 X 01- 06 |
| शुक्रवार ते शनिवार | साप्ताहिक |
| 1 227 588 6 277 330 | 2 336 499 7 188 449 |
| 12 - 17 x 62 - 67 | 23 - 28 X 73 - 78 |

साप्ताहिक CP 56 X 45 67 X 34 12 X 23

विचार बदला नशीब बदलेल
संपर्क : 9970640587


# राज्यस्तरीय 'कलाभूषण' पुरस्कार अजय कुलकर्णी यांना प्रदान



**नेवासा**
सार्व मंथन । प्रतिनिधी

नेवासा ही कर्मभूमी असलेले आणि सध्या पुणे येथे सामाजिक कार्यात सक्रिय असलेले सोशल वर्कर अजय अंबादास कुलकर्णी यांना श्री सिद्धेश्वर बहुउद्देशीय संस्थेचा राज्यस्तरीय 'कलाभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. नेवासा येथील हॉटेल प्रणामच्या सभागृहात झालेल्या सोहळ्यात हा सन्मान उत्साहात पार पडला.

श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे यांच्या हस्ते तसेच नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले म्हणाले की, अजय कुलकर्णी यांनी समाजात मोलाचे योगदान दिले आहे. उपेक्षित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. त्यांनी एक सशक्त सांस्कृतिक चळवळ उभी केली असून त्यांच्या कार्यास उज्ज्वल भवितव्य आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे सर म्हणाले की, अजय कुलकर्णी यांचे वडील अंबादास कुलकर्णी यांनी तहसीलदार म्हणून तालुक्याच्या विकासात मोलाचे कार्य केले.

पान १ वरून पान १ वरून

## अहिल्यानगर जिल्ह्यातील तापमानात वाढ

डोके, मान व चेहरा झाकावा. गडद, घट्ट व जाड कपड्यांऐवजी हलके, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. प्रवासात पिण्याचे पाणी नेहमी सोबत ठेवावे. अशक्तपणा, डोकेदुखी व सतत येणारा घाम ही उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखून चक्कर येत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. उष्णतेच्या लाटेची माहिती मिळवण्यासाठी रेडिओ, टी.व्ही. व वर्तमानपत्रांचा वापर करावा. उन्हात अतिकष्टाची व शारीरिक श्रमाची कामे करू नयेत. कामगारांनी उन्हात काम करताना डोक्यावर पांढरा रुमाल बांधावा. सूर्यप्रकाशाचा थेट संबंध टाळण्याबाबत कामगारांना सूचित करावे. कामाच्या ठिकाणी थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी. पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त काम उरकून घ्यावे व उन्हात काम करताना थोड्या अंतराने विश्रांती घ्यावी. गरोदर स्त्रिया व आजारी कामगारांची विशेष काळजी घ्यावी. घरे थंड ठेवण्यासाठी व घरात थेट सूर्यप्रकाश येऊ नये म्हणून पडदे, झडपा, शटर व सनशेडचा वापर करावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पंखे व ओले कपडे वापरून वेळोवेळी थंड पाण्याने स्नान करावे. उन्हाळ्याच्या काळात शक्यतो स्वयंपाक करणे टाळावे व मोकळ्या हवेसाठी स्वयंपाकघराची दारे खिडक्या उघड्या ठेवाव्यात. दारू, चहा, कॉफी व कार्बोनेटेड थंड पेये घेणे टाळावे. उन्हापासून स्वतःसह जनावरांचे संरक्षण होईल याची दक्षता घ्यावी. लहान मुलांना व पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. नागरिकांनी या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहनही गिते यांनी केले आहे.

## ...तर कार्यक्रम लागतो : डॉ. विखे

असे सांगितले जात होते, मात्र ते काम आम्ही पूर्ण केले. पाणी हे नागरिकांचे मत परिवर्तन घडवते. पुढील पन्नास वर्षे नगर समृद्ध राहील. राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना ते म्हणाले की, राहुरी तालुक्याला विकासाच्या दृष्टीने पुढे न्यायचे आहे. माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी निवडणूक न लढवण्याचा घेतलेला निर्णय सकारात्मक आहे, त्याबद्दल त्यांचे आभार. राहुरीतील अनेक वर्षांचा संघर्ष आता थांबला आहे. संघर्षातून अर्थकारण वाढते, पण विकास होत नाही. ते पुढे म्हणाले की, स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी राहुरी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली. त्या कामांची परतफेड करण्याची जबाबदारी आपली आहे. आपला पक्ष एक नंबरचा असून अक्षय कर्डिले यांना एक नंबरनेच आमदार करायचे आहे. साखर उद्योगाबाबत त्यांनी सांगितले की, १२ हजार टन क्षमतेचा कारखाना सुरू करण्यात आला असून त्यामुळे कोणाचाही ऊस शिल्लक राहणार नाही. ते पुढे म्हणाले, पुढील काळात अहिल्यानगर जिल्ह्यात तीन लोकसभा मतदारसंघ होतील. आज सकाळी सात वाजल्यापासून नगर-मनमाड रस्त्यावर उभे राहून काम सुरू केले असून या कामासाठी तीन किलोमीटर पायी चाललो. वांबोरी परिसरातील नागरिकांनी अक्षय कर्डिले यांना मोठ्या मताधिक्याने आमदार करण्याचा निर्धार केला आहे. यावेळी ज्येष्ठ नेते सुभाष पाटील म्हणाले की, स्वर्गीय आमदार अरुण काका जगताप यांच्या माध्यमातून माझी आणि स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांची मैत्री झाली. कर्डिले यांची काम करणाऱ्या माणसाची ओळख आहे. त्यांच्या कामाला मते देऊन अक्षय कर्डिले यांना आमदार करायचे आहे. ते पुढे म्हणाले, वांबोरी चारीचे शिल्पकार कै. बाळासाहेब विखे पाटील आहेत. डॉ. सुजय विखे हे फक्त डॉ. नसून न्युरोसर्जन आहेत. लोकांच्या डोक्यात काय चालते हे त्यांना समजते. काम करणाऱ्या लोकांकडेच जनता जाते आणि लोकदरबारात प्रश्न मार्गी लागतात, त्यामुळेच गर्दी होते. उमेदवार अक्षय कर्डिले यांनी आपल्या भाषणात सांगितले की, माझ्या वडिलांचे विकासाचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. सर्वांना सोबत घेऊन मतदारसंघात विकासाची गंगा आणायची आहे. त्यामुळे मतदारांनी विकास कामांसाठी मतदान करावे. या बैठकीला उमेदवार अक्षय कर्डिले, ज्येष्ठ नेते सुभाष पाटील, भाजप तालुकाध्यक्ष सुरेश बानकर, सुखदेव कुसमुडे, विक्रम तांबे, हरिभाऊ कर्डिले, उदयसिंह पाटील, प्रभाकर हरिश्चंद्र, किरण ससाणे, भाऊसाहेब साठे, प्रशांत नवले, अशोक उंडे, ज्ञानदेव शिंदे, सुरेश सुंबे यांसह वांबोरी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात

### किशोर पातोरे यांचे निधन



सार्व मंथन राहुरी । राहुरी येथील सामाजिक कार्यकर्ते किशोर विठ्ठल पातोरे (वय ४८) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे. किशोर पातोरे हे सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असलेले युक्तीमत्व होते. ते माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचे कट्टर समर्थक होते. किशोर पातोरे यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, बहीण, पुतणे असा परिवार आहे.

### विमलबाई ईरले यांचे निधन



सार्व मंथन नेवासा । येथील विमलबाई बजरंग ईरले (वय ५७) यांचे नुकतेच निधन झाले. अत्यंत मनमिळाऊ स्वभाव आणि धार्मिक वृत्ती असलेल्या विमलबाईंनी आपल्या प्रेमळ वागणुकीने मोठा स्नेहसंग्रह जोडला होता. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. विमलबाई या नेवासा येथील प्रसिद्ध मूर्तिकार बजरंग ईरले यांच्या पत्नी, तर सामाजिक कार्यकर्ते तथा मूर्तिकार विलास ईरले आणि कैलास ईरले यांच्या मातोश्री होत. तसेच, माजी नगरसेवक तथा कॉन्ट्रॅक्टर अंबादास ईरले यांच्या त्या चुलती होत्या.

### महापारेषणची हॉट लाईन भत्त्यात ४० टक्क्यांपर्यंत वाढ

सार्व मंथन नेवासा । महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (महापारेषण) यांनी क्षेत्रीय कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. हॉट लाईन युनिटचा भत्ता ३३.३३ टक्क्यांवरून वाढवून ४० टक्के करण्यात आला आहे. प्रशासकीय परिपत्रक क्र. ७०३ नुसार कामगिरीवर आधारित प्रोत्साहन भत्ताही लागू करण्यात आला आहे. या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. महापारेषणचे हॉट लाईन युनिट वीज पुरवठा सुरू असतानाच दुरुस्ती व देखभाल करते. त्यामुळे वीज खंडित करण्याची गरज राहत नाही. लोडशेडिंग टाळता येते. राज्यभर अशा युनिट्सचे मोठे जाळे आहे. नव्या निर्णयामुळे नियमित देखभालीवर अधिक भर दिला जाणार आहे. या परिपत्रकावर सुरुवातीला काही संघटनांनी नाराजी व्यक्त केली होती. मानव संसाधन विभागाच्या कार्यकारी संचालिका सुचिता भिकाने आणि मुख्य महाव्यवस्थापक राजू गायकवाड यांनी संघटनांशी चर्चा केली. शंकांचे निरसन झाले. त्यामुळे कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, संचालक सतीश चव्हाण आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आला. यामुळे कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढेल. उत्पादकता सुधारेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. भविष्यातील तांत्रिक बिघाड टळणारनवीन नियमावलीमुळे ४००, २२० आणि १३२ केव्ही उपकेंद्रांतील उपकरणांची तपासणी वीज सुरू असतानाच करता येणार आहे. त्यामुळे बिघाड आधीच ओळखता येतील. ते टाळता येतील. औद्योगिक, व्यापारी व कृषी क्षेत्राचा वीज पुरवठा खंडित होणार नाही. सिस्टीमची कार्यक्षमता वाढेल.

# माझे खाते बनावट त्याच्याशी काहीही संबंध नाही

## प्रतिभा चाकणकर यांची माहिती; तबब्ल आठ तास केली चौकशी

**शिर्डी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

समता पतसंस्थेतील संशयास्पद खात्यांप्रकरणी रुपाली चाकणकर यांच्या भगिनी प्रतिभा चाकणकर यांची शिर्डी पोलिस ठाण्यात तब्बल आठ तास चौकशी करण्यात आली. यावेळी त्यांचा मुलगा चिन्मय चाकणकर याचाही जबाब नोंदवण्यात आला. समता पतसंस्थेतील त्यांच्या नावावरील खात्यांबाबत पोलिसांनी सविस्तर चौकशी केल्याची माहिती समोर आली आहे.

समता पतसंस्थेत प्रतिभा चाकणकर यांच्या नावावर दोन तर मुलाच्या नावावर दोन अशी एकूण चार खाती असल्याचे तपासात समोर आले आहे. या खात्यांमधून तब्बल २ कोटी ४० लाख रुपयांचे व्यवहार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या खात्यांवर भोंदू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशोक खरात याला वारसदार दाखवण्यात आल्याची बाबही तपासात पुढे आली आहे.

चौकशीनंतर माध्यमांशी बोलताना प्रतिभा चाकणकर यांनी खळबळजनक दावा करत, समता पतसंस्थेतील खाते आपण उघडले नसल्याचे स्पष्ट केले. मी स्वतः कधीही या खात्यावरून व्यवहार केलेला नाही. देवदर्शनाच्या नावाखाली अशोक खरात यांनी कागदपत्रे घेतली होती. व्हॉट्सॲपवर पाठवलेल्या कागदपत्रांचा वापर करून खाते उघडण्यात आले असावे, असा दावा त्यांनी केला. खाते बनावट असून सह्याही बनावट करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. माध्यमांमधील बातम्या पाहिल्यानंतर मी स्वतःहून जबाब देण्यासाठी आले आहे. आम्हाला पोलिसांकडून अद्याप नोटीस मिळालेली नाही, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, प्रतिभा चाकणकर यांच्या वकील जयश्री काळेपालवे यांनीही या खात्यांबाबत गंभीर आक्षेप घेतले. प्रतिभा चाकणकर आणि त्यांच्या मुलाच्या नावाने बनावट खाती उघडण्यात आली आहेत. त्या कधीही समता पतसंस्थेत गेल्या नाहीत. खाते उघडताना चुकीचा पत्ता वापरण्यात आला आहे. सह्यांचे नमुने पोलिसांना देण्यात आले असून तपासात सहकार्य करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

पुढील कायदेशीर कारवाईबाबत निर्णय लवकरच घेतला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, समता पतसंस्था प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने देखील तपासाची सूत्रे हाती घेतली आहेत. भोंदू अशोक खरात वारसदार असलेल्या सुमारे १०० खात्यांची चौकशी सुरू असून या खात्यांमधून तब्बल ६० कोटी रुपयांचे व्यवहार झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

ईडीचे पथक राहाता येथील शाखेत दाखल झाले असून गेल्या नऊ तासांपासून कागदपत्रांची तपासणी सुरू आहे. शिर्डी पोलिसांसह ईडीकडून सुरू असलेल्या या संयुक्त तपासामुळे समता पतसंस्था प्रकरण अधिकच गंभीर बनले असून आगामी काळात आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




### देवळाली प्रवरा नगरपरिषदेच्या विरोधात

# विरोधी पक्षनेत्यांचे शिष्टमंडळ आक्रमक

## जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडली गैरकारभाराची कौफियत

**देवळाली प्रवरा**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील देवळालीप्रवरा नगरपरिषदमध्ये सुरु असलेल्या सावळ्या गोंधळा विरोधात विरोधी पक्ष नेत्यांचे शिष्ट मंडळाने थेट जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन देवळाली प्रवरा नगरपरिषदेत सुरु असलेल्या सावळ्या गोंधळाचा काळा चिठ्ठा जिल्हाधिकाऱ्यां समोर मांडला.



वाढीव पाणीपट्टी दराच्या संदर्भात असलेला ठराव जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने तात्काळ रद्द करावा. नगर परिषदेने भेद भावाने राजकीय हस्तक्षेप करून ठराविक लोकांचे अतिक्रमण काढून पुनर्वसन न करता अतिक्रमण कारवाई बाबत, देवळाली प्रवरा नगर परिषदेने आठवडे बाजार कर वसुली व अन्य नगरपरिषदेच्या वाढीव कर वसुली संदर्भात निवेदन देण्यात आली. सैनिकाची पत्नी पूनम कदम यांची कागदो पत्री छळवणूक प्रकरणी कायदेशीर नियमाचा उपयोग करावा, म्हणून या विषयाच्या संदर्भात जिल्हाधिकारी यांना सैनिकाची पत्नी पुनम कदम यांच्या वतीने त्यांच्यावर झालेल्या अन्यायाच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांना न्याय मागण्यात आला. नगराध्यक्ष सत्यजित कदम यांची चौकशी करण्यासंदर्भात पोलिसांना आदेश देण्यात यावे. सर्वसाधारण सभेमध्ये वाढीव पाणीपट्टी धोरणाच्या विरोधामध्ये नगरपालिकेसमोर आंदोलन करून नागरिकांनी निश्चित नोंदवला. परंतु त्याची दखल जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अधिकारात घेऊन झालेला ठराव तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी चर्चा शिष्टमंडळाने केली. तर तुमच्या विरोधात कोर्टात सुद्धा जावे लागेल, अशी भूमिका शिष्ट मंडळाने घेतली. आठवडे बाजारामध्ये व्यापारांकडून करवसुली व अतिक्रमण काढण्याच्या संदर्भामध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी महाविकास आघाडीचे गटनेते दासभाऊ तुकाराम पठारे, नगरसेविका सुनिता थोरात, नगरसेवक शरद वाळुंज, पूनम कदम, वैभव गिरमे, दत्ता कडू, कुमार भिंगारे, अनिल चव्हाण, वसंत कदम, प्रहार जनशक्ती पक्षाचे आप्पासाहेब ढुस, सुनील वाळुंज, गणेश भालके, स्नेहल दिवे, माधुरी कदम, हिराबाई कदम आदी उपस्थित होते.

# निवडणूक कामात हलगर्जीपणा भोवला

## दोन शिक्षकांवर फौजदारी गुन्हा दाखल

**नेवासा**
सार्व मंथन । प्रतिनिधी

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदार मॅपिंग प्रक्रियेत कसूर केल्याप्रकरणी आणि शासकीय नोटीस स्वीकारण्यास नकार दिल्याबद्दल नेवासा प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. तहसीलदार संजय पुंडलिकराव बिरादार यांच्या फिर्यादीनुसार दोन शिक्षकांविरुद्ध नेवासा पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून, यामुळे शिक्षक वर्गात खळबळ उडाली आहे.

अंबादास रामराव जाधव (सहशिक्षक, शहालीबाबा माध्यमिक विद्यालय, पिंपरी शहाली) व मेघराज नारायण तुंवर (माध्यमिक शिक्षक, आदर्श विद्यालय, सोनई) असे गुन्हा दाखल झालेले शिक्षक आहेत.

नेवासा विधानसभा मतदारसंघात मतदारयादी अद्ययावत करणे आणि मतदार मॅपिंगचे काम सुरू आहे. यासाठी मतदान केंद्र क्रमांक २५८ (पिंपरी शहाली) आणि १४९ (सोनई) येथे संबंधित शिक्षकांची 'बीएलओ' म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, निवडणूक आयोगाचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य असतानाही संबंधित शिक्षकांनी मॅपिंगचे काम पूर्ण केले नाही.

या हलगर्जीपणाबाबत प्रशासनाने नोटीस बजावण्याचा प्रयत्न केला असता, संबंधितांनी ती स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला. शासकीय आदेशाची पायमल्ली केल्याचा ठपका ठेवत तलाठ्यांनी पंचनामा करून अहवाल सादर केला. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

### रामदास धुमाळ ट्रक ट्रान्सपोर्ट सोसायटीच्या

# चेअरमनपदी पोपटराव जाधव

**मानोरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

## मानोरी ग्रामस्थांकडून सत्कार



रामदास धुमाळ ट्रक ट्रान्सपोर्ट सोसायटीच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल पोपटराव जाधव यांचा मानोरी ग्रामस्थांकडून उत्साहात सत्कार करण्यात आला.

यावेळी पोपटराव जाधव यांना पुष्पगुच्छ व शाल-श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास राहुरी पंचायत समितीचे माजी उपसभापती रविंद्र आढाव, माजी सरपंच हाजी अब्बासभाई शेख दयावान, बाळासाहेब पोटे, डॉ.राजेंद्र पोटे, पिरखाँभाई पठाण, डॉ. बाबासाहेब आढाव, इब्राहिमभाई पठाण, किशोर जाधव, राजूभाई पठाण, भाऊराव पोटे, चांदभाई शेख, आसिफ पठाण आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच ग्रामस्थांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

याप्रसंगी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून पोपटराव जाधव यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली सोसायटीच्या कार्यात अधिक प्रगती होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रम मानोरी ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आला असून, तो उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

### आचाऱ्याला मारहाण; गुन्हा दाखल

सार्व मंथन राहुरी । राहुरी शहरातील एका हॉटेलमध्ये स्वयंपाक करत असताना स्वयंपाकात चुक झाल्याने हॉटेल मालकाने आचाऱ्याला लाकडी दांडा व लाथाने बेदम मारहाण केल्याची घटना दि. ७ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. संजय लोखंडे, रा. दत्तनगर, राहुरी. हे गेल्या १२ वर्षापासून राहुरीत काम करतात हॉटेलामध्ये आचारी म्हणुन काम करतात. दरम्यान संजय लोखंडे हे हॉटेलमध्ये स्वयंपाक करत असताना त्यांच्याकडून स्वयंपाकात चूक झाली. याचा राग आल्याने हॉटेल मालकाने आचारी संजय लोखंडे यांना लाकडी दांड्याने मारहाण करुन रक्त भंबाळ केले. तसेच लाथांनी मारहाण केली. या घटनेत संजय लोखंडे हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर राहुरी शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. हॉटेल मालकाविरूद्ध पोलीस ठाण्यात मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

### पती-पत्नीला शिवीगाळ करुन

# लोखंडी गज व लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण

**राहुरी फॅक्टरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

## राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

तुम्ही या रस्त्याने जायचे नाही, असे म्हणत आरोपींनी पती पत्नीला शिवीगाळ करुन लोखंडी गज व लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील गणेगाव येथे दि. ८ एप्रिल रोजी दुपारच्या दरम्यान घडली.

सोनाली मयुरेश चौधरी, वय २३ वर्षे, रा. कणगर, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, चौधरी यांनी भास्कर नारायण कोबरणे यांची गणेगाव शिवारातील शेत जमीन घेतलेली असुन ते चौधरी यांना शेतात जाण्यासाठी रस्ता देत नाही. आणि त्या कारणाने वेळोवेळी वाद घालतात. दि. ८ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास सोनाली चौधरी व त्यांचे पती मयुरेश हे गहु काढण्याचे मशीन घेऊन रस्त्यावरून जात होते. त्यावेळी आरोपी तेथे आले म्हणाले कि, तुम्ही या रस्त्याने जायचे नाही. तेव्हा मयुरेश त्यांना म्हणाले कि, आम्ही तुमची जमिन घेतलेली असुन तुम्ही सांगितलेल्या रस्त्यानेच आम्ही जात आहोत. असे म्हणाल्याचा राग आल्याने आरोपींनी सोनाली चौधरी व त्यांचे पती मयुरेश यांना शिवीगाळ करुन लोखंडी गज व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून तुम्ही जर आमच्या नादी लागले तर तुमचा एक एकाचा कार्यक्रम करू, अशी जिवे मारण्याची धमकी दिली. या घटनेत मयुरेश हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर राहुरी फॅक्टरी येथील रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

सोनाली मयुरेश चौधरी यांनी राहुरी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी शिवाजी भास्कर कोबरणे, सुनिता शिवाजी कोबरणे, लिलाबाई भास्कर कोबरणे, भास्कर नारायण कोबरणे, नितीन शिवाजी कोबरणे, सर्व रा. गणेगाव, ता. राहुरी, या ५ जणांवर मारहाण व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

### ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी

# डिजिटल शिक्षण काळाची गरज : मुख्यमंत्री फडणवीस

## कर्जत-जामखेडमधील १४० शाळांमध्ये डिजिटल शैक्षणिक साहित्याचे लोकार्पण; सभापती प्रा. राम शिंदे यांचा पुढाकार

**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

शिक्षणात तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करून ग्राम ीण भागातील विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धात्मक जगासाठी सक्षम करणे हे राज्य शासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण उपलब्ध करून देणे ही काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

कर्जत-जामखेड तालुक्यातील १४० जिल्हा परिषद शाळांसाठी डिजिटल शैक्षणिक साहित्याचा लोकार्पण सोहळा आज पार पडला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दूरसंवाद प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. जामखेड येथील तापनेश्वर जिल्हा परिषद शाळेत विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे उपस्थित होते. यावेळी जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, शालेय शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी तसेच शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ दूरसंवाद प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी स्थानिक विकास निधीतून कर्जत व जामखेड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांच्या आधुनिकीकरणावर भर दिला आहे. हा प्रकल्प ग्रामीण व शहरी भागातील शिक्षणातील दरी कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून आपल्या अध्यापन कौशल्यात वाढ करावी आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.



या साधनांच्या उपलब्धतेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित दर्जेदार शिक्षण मिळणे अधिक सुलभ होणार आहे. दृक्-श्राव्य माध्यमांच्या वापरामुळे वर्गातील शिक्षण प्रक्रिया अधिक संवादात्मक व प्रभावी होईल. त्यामुळे अवघड विषय समजणे सोपे होईल. या आधुनिकीकरणामुळे स्थानिक विद्यार्थ्यांचा शैक्षणिक सहभाग वाढेल आणि त्यांच्या सर्वांगीण प्रगतीला गती मिळेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

ग्रामीण व शहरी भागातील शैक्षणिक गुणवत्तेतील तफावत दूर करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. नवीन डिजिटल साधनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण होऊन शिक्षण प्रक्रिया अधिक रंजक व सुलभ होईल. तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपले आत्मबळ वाढवावे, जेणेकरून ते स्पर्धा परीक्षा, विज्ञान व तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांत जागतिक स्तरावर आत्मविश्वासाने यश मिळवू शकतील, असा विश्वास विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केला.

शिक्षकांनी डिजिटल साधनांचा केवळ वापर न करता त्या माध्यमातून अध्यापन पद्धतीत मूलभूत बदल घडवून आणावेत. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव देत शिक्षण प्रक्रिया तणावमुक्त कशी करता येईल, याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन आणि अत्याधुनिक सुविधा यांच्या संगमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत मोठी झेप घेण्याची क्षमता निर्माण होईल. विद्यार्थ्यांचा अभ्यासातील सहभाग वाढवण्यासाठी शिक्षकांनी या सुविधांचा सातत्याने प्रभावी उपयोग करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

विद्यार्थ्यांनी आयुष्यात मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि सतत ज्ञान संपादनाची वृत्ती जोपासावी. केवळ शालेय अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता जागतिक स्तरावरील ज्ञानाशी जोडले जाण्यासाठी या सुविधांचा उपयोग करावा. पालकांनीही आपल्या पाल्यांच्या प्रगतीत सक्रिय सहभाग नोंदवून त्यांना प्रोत्साहन द्यावे. भविष्यात हे विद्यार्थी वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ होऊन शहरातील विद्यार्थ्यांच्या तोडीस तोड यश संपादन करतील, अशी अपेक्षाही सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केली.




सायं. दैनिक
# सार्व मंथन
नवी दिशा, नवी आशा
मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ पान ०४




# कर्डिलेंच्या प्रचारार्थ विखे-राजळेंचा प्रचार झंझावात

## 'माझं बूथ, माझी जबाबदारी' या भावनेतून कार्यकर्त्यांने आपल्या गावात सक्रिय होण्याचे विखेंसह राजळेंकडून आवाहन

**राहुरी**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

राहुरी – नगर – पाथर्डी मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून भारतीय जनता पार्टी महायुतीचे अधिकृत उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारार्थ मिरी, लोहसर व तिसगाव परिसरातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

एखाद्या लोकप्रिय नेत्याच्या दुर्दैवी निधनानंतर पोटनिवडणूक बिनविरोध करण्याची जिल्ह्यात परंपरा असताना, यावेळी विरोधकांनी राजकारण करत निवडणूक लादली, ही दुर्दैवी बाब असल्याची टीका डॉ. विखे पाटील यांनी केली. बारामतीला एक न्याय आणि राहुरीला दुसरा न्याय का? असा सवाल उपस्थित करत त्यांनी अप्रत्यक्षपणे शरद पवार यांच्यावर निशाणा साधला.

बैठकीत बोलताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, जो पाणी देईल, त्यालाच निवडून द्या. वांबोरी चारीचे पाणी प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पोहोचले पाहिजे, हीच आमची




भूमिका आहे. जिरायत भागाला पाणी मिळवून देणे, विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि शेतकऱ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवणे हेच आपले ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

३९ गावांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या वांबोरी पाणी योजनेचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्याचे काम वेगाने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले आणि आमदार मोनिका राजळे यांच्या माध्यमातून या भागात पाणी पोहोचवण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

स्व. कर्डिले साहेबांनी ३९ गावांमध्ये राबवलेली विकासकामे, लोकांशी ठेवलेला जिव्हाळा व प्रत्येकाच्या सुख–दुःखात दिलेला आधार याची आठवण करून देत, ही निवडणूक स्वतःची समजून कार्यकर्त्यांनी काम करावे, असे आवाहन करण्यात आले. २३ तारखेला सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत होणाऱ्या मतदानात ९५ टक्क्यांहून अधिक मतदान घडवून आणण्याची जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्याने घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

माझं बूथ माझी जबाबदारी या भावनेतून प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या गावात सक्रिय राहावे, असे आवाहन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली असून ही विकासाची गती कायम ठेवण्यासाठी अक्षय कर्डिले यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन त्यांनी केले.

गेल्या अनेक वर्षांत कर्डिले साहेबांनी ३९ गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली असून प्रत्येकाच्या सुख–दुःखात त्यांनी कायम लोकसंपर्क ठेवला. वांबोरी पाणी योजनेचा पहिला व दुसरा टप्पा, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, सभामंडप उभारणी यांसारख्या अनेक विकासकामांतून या भागाला दिशा मिळाली आहे. ग्रामपंचायत स्तरापासून ते सहकार क्षेत्रातील विविध पदांच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी मोठे योगदान दिले. या सर्व कामांची जाणीव ठेवून प्रत्येक कार्यकर्त्याने एकजुटीने काम करत अक्षय दादा कर्डिले यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार करावा, असे आवाहन आमदार मोनिका राजळे यांनी केले.

या बैठकीला आमदार मोनिका राजळे यांच्यासह भाजपा महायुतीचे पदाधिकारी, सरपंच, सोसायटीचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने अक्षय कर्डिले यांच्या विजयासाठी जोरदार काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

---

### राहुरीतील शनिचौकात धाडसी चोरी

# बंद घर फोडून लाखोंचा ऐवज लंपास!

## जुना वाद ठरला कारण? शेजाऱ्यांसह चौघांवर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**राहुरी**
**सार्व मंथन । शहर प्रतिनिधी**

राहुरी शहरातील शनिचौक परिसरात एका बंद घरावर डोळा ठेवत चोरट्यांनी मोठी चोरी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेत लाखो रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व घरगुती साहित्य लंपास करण्यात आले असून, या प्रकरणी शेजाऱ्यांसह चौघांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अच्युत रघुनाथ पोपळघट (वय ६४, रा. शनिचौक, राहुरी) हे सध्या तनपुरेवाडी रोड येथे सुरू असलेल्या नवीन बांधकामाजवळ तात्पुरत्या शेडमध्ये वास्तव्यास होते. त्यामुळे त्यांचे शनिचौकातील घर गेल्या सहा महिन्यांपासून बंद होते.

दरम्यान, दि. ५ एप्रिल २०२६ रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास पोलिसांच्या चौकशीसाठी ते जुन्या घरी गेले असता, त्यांच्या घरात चोरी झाल्याचे उघड झाले. घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करण्यात आला होता. तसेच घरासमोर उभी असलेल्या कॉलिस (एमएच १७ के ३७९) वाहनाची काच, बोनेट, इंजिन, डिझेल टाकी यांची तोडफोड करण्यात आली होती. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनाही नुकसान करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याचे स्पष्ट झाले.

या घटनेत सुमारे ४ लाख ३९ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व इतर घरगुती साहित्य चोरीस गेल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, अच्युत पोपळघट व त्यांचे शेजारी सदानंद पोपळघट यांच्यात पूर्वीपासून जागेच्या वादावरून मतभेद होते आणि हा वाद न्यायालयातही प्रलंबित आहे. या पार्श्वभूमीवर अच्युत पोपळघट यांच्या फिर्यादीवरून सदानंद घनश्याम पोपळघट, घनश्याम दत्तात्रय पोपळघट, रेणुका घनश्याम पोपळघट व मेघना घनश्याम पोपळघट (सर्व रा. शनिचौक, राहुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, शहरात या घटनेमुळे खळबळ उडाली आहे.

---

# राहुरी पोलीस ठाण्यात महिलेला शिवीगाळ केल्याचा प्रकार

**राहुरी**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील तांदुळवाडी येथील ६१ वर्षीय महिलेने धमकी व अपमानास्पद वर्तनाबाबत राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

राहुरी तालुक्यातील पूर्व भाग असलेल्या एका ६१ वर्षिय बहिणी महिलेने दिलेल्या फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, त्या पंचायत समिती राहुरी येथे गेल्या असताना ग्रामसेवकाविरोधात दाखल झालेल्या तक्रारीबाबत त्यांनी संबंधित ग्रामसेवकाशी दूरध्वनीवर संपर्क साधला होता. या घटनेचा राग मनात धरून ताहाराबाद येथील गंगाधर विधाटे यांनी त्यांना फोन करून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यानंतर दुपारी साडेतीनच्या सुमारास भालेराव या राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेल्या असताना आरोपी तेथे येऊन मोठ्याने आरडाओरडा करत त्यांच्याविरुद्ध अपमानास्पद आरोप करत घोषणाबाजी केली. तसेच, पोलीस ठाण्याच्या आवारातच अयोग्य हावभाव करून त्यांना लज्जास्पद वर्तनाला सामोरे जावे लागल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

याशिवाय, खोटे गुन्हे दाखल करून दाखवण्याची धमकीही आरोपीने दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार ठाणगे करत आहे.

---

# HPV लसीकरण सुरक्षितच; अफवांना बळी पडू नका

**राहुरी**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

HPV लसीकरणाबाबत सोशल मीडियावर पसरत असलेल्या अफवांच्या पार्श्वभूमीवर राहुरी तालुका आरोग्य अधिकारी दिपाली गायकवाड यांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. १४ ते १५ वयोगटातील मुलींनी ही लस आवर्जून घ्यावी आणि कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.



शासनाच्या वतीने ८ मार्चपासून क्षात लसीकरण मोहिमेला सुरुवात करण्यात आली असून ही लस पूर्णपणे सुरक्षित असल्याचे आरोग्य विभागाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. मी स्वतःही ही लस घेतलेली आहे, असे सांगत गायकवाड यांनी नागरिकांचा विश्वास वाढवण्याचा प्रयत्न केला.

मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने क्षात लसीकरण अत्यंत महत्त्वाचे असून भविष्यात गंभीर आजारांपासून संरक्षण मिळवण्यासाठी ही लस उपयुक्त ठरते, असेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे पालकांनी पुढाकार घेऊन आपल्या मुलींना लसीकरण करून द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

# कोल्हार खुर्द येथे महात्मा फुले जयंती साजरी

## स्थानिक नेत्यांची उपस्थिती; सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा पुनरुच्चार

**कोल्हार**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील शेवटचे गाव म्हणून ओळख असलेल्या कोल्हार खुर्द येथे ग्रामपंचायतीच्या वतीने महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्साहात आणि दिमाखात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात सामाजिक समता, शिक्षण आणि शेतकरी हितासाठी फुले यांनी दिलेल्या



विचारांचा जागर करण्यात आला.

यावेळी सरपंच अनिता दिगंबर शिरसाठ, उपसरपंच विमल भोसले, सोसायटीचे संचालक प्रभाकर जाधव, दिगंबर पाटील यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य दिग्विजय शिरसाठ, प्रतीक पाटील, सदानंद शिरसाठ, प्रकाश शिरसाट, रवींद्र शिरसाट, दिगंबर घोगरे, पोपटराव लोंढे, धनंजय शिरसाट, प्रदीप भोसले, रोहित घोगरे, प्रशांत शिरसाट, निलेश शिरसाठ आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून फुले यांच्या सामाजिक न्यायाच्या लढ्याची आणि शिक्षणाच्या महत्त्वाची आठवण करून दिली.

---

# सोनई पोलिसांची अवैध धंद्यावर कारवाई

**घोडेगाव**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

सोनई पोलीसांनी पानेगाव माका येथे सुरू असलेल्या अवैध धंद्यावर कारवाई करत गुन्हे दाखल केले आहेत. दि. १३ रोजी ज्ञानदेव चिमाजी थोरात (वय.५५) रा. माका हा गावातील बाजार तळावरील कट्यावर विनापरवाना बेकायदेशीर रित्या कल्याण मटका नावाचा हार जितीचा खेळ खेळताना व खेळविताना मिळुन आला ९०० रुपये रोख रक्कम व खेळण्यासाठी लागणारे साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस कॉन्स्टेबल प्रविण क्षिरसागर यांच्या फिर्यादी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल नानासाहेब तुपे हे करत आहेत. त्याच प्रमाणे पानेगाव येथे वसंत दामु जंगले (वय.५०) हा आपल्या राहत्या घरामध्ये विनापरवाना बेकायदेशीर कल्याण मटका नावाचा हार जितीचा खेळ खेळताना व खेळविताना आढळून आला.

---

# टाकळीमिया येथे विहिरीत पडलेला बिबट्या सुखरूप बाहेर

## वन विभागाची तत्पर कारवाई

**टाकळीमिया**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील टाकळीमिया येथे एका शेतकऱ्याच्या विहिरीत पडलेल्या जिवंत बिबट्याला वन विभागाने शर्थीचे प्रयत्न करून सुखरूप बाहेर काढले. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

टाकळीमिया येथील शेतकरी पांडु माळवे यांच्या शेतातील विहिरीत सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळच्या सुमारास बिबट्या पडल्याचे निदर्शनास आले. ही बाब लक्षात येताच माळवे यांनी परिसरातील शेतकऱ्यांना याची माहिती दिली. बिबट्या जिवंत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर तात्काळ वन विभागाशी संपर्क साधण्यात आला.

माहिती मिळताच वन क्षेत्रपाल ज्ञानेश्वर साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. या पथकात वनपाल बाळू आटोळे, संदीप कोरके, वनरक्षक निलेश जाधव, महेश ससे तसेच कर्मचारी प्रदीप कोहाकडे, अली इनामदार, शशिकांत मोरे आणि चालक ताराचंद गायकवाड यांचा समावेश होता.



वन विभागाच्या पथकाने अत्यंत नियोजनबद्ध आणि सावध पद्धतीने बचावकार्य राबवत बिबट्याला कोणतीही इजा न होता अलगद विहिरीतून बाहेर काढले. त्यानंतर त्याला सुरक्षितपणे पिंजऱ्यात कैद करून पुढील कार्यवाहीसाठी रवाना करण्यात आले.

दरम्यान, यापूर्वीही माळवे यांच्या वस्तीवर बिबट्याने कालवड व शेळीचा फडशा पाडल्याच्या घटना घडल्या होत्या. त्यामुळे हा बिबट्या शिकारीच्या शोधात असताना विहिरीत पडल्याचा अंदाज स्थानिक शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. बिबट्याला पकडण्यात यश आले असले तरी परिसरात अद्यापही भीतीचे वातावरण कायम असून, नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

# रोजगार सहाय्यकांच्या आंदोलनामुळे मनरेगा कामे ठप्प

## । मजुरांवर उपासमारीची वेळ; ग्रामस्थांमध्ये नाराजी

**मालुंजे**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत कार्यरत रोजगार सहाय्यकांनी १ एप्रिलपासून सुरू केलेल्या कामबंद आंदोलनाचा थेट फटका ग्रामीण भागातील रोजंदारी मजुरांना बसत आहे. गेल्या १२ दिवसांपासून आंदोलन सुरू असतानाही शासनाकडून ठोस निर्णय न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

रोजगार सहाय्यकांनी शासनाकडे विविध मागण्यांसाठी निवेदन देऊन काम बंद आंदोलन पुकारले आहे. मात्र, महाराष्ट्र शासनाने अद्याप याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्याने ग्रामपंचायत स्तरावरील अनेक विकासकामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. इतर राज्यांत मनरेगा कामे सुरळीत सुरू असताना महाराष्ट्रात मात्र जीआर लागू करण्यात झालेल्या विलंबामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

या आंदोलनामुळे घरकुल बांधकाम, विहीर खोदकाम, गाय गोठा, शेळीपालन शेड, कुक्कुटपालन शेड, बांधावर व रस्त्याकडेला वृक्षलागवड, शौचालय बांधकाम, वनविभागातील रोप निर्मिती आदी अनेक कामे बंद पडली आहेत. या सर्व कामांसाठी आवश्यक असलेले मस्टर आणि मजुरी प्रक्रिया थांबल्याने मजुरांचे उत्पन्न अचानक बंद झाले आहे.



दररोजच्या मजुरीवर उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून अनेकांना पर्यायी रोजगारासाठी स्थलांतर करावे लागत आहे. काही कुटुंबांवर तर दैनंदिन गरजा भागवण्यासाठी कर्ज घेण्याची वेळ आली आहे.

ग्रामस्थ आणि मजुरांकडून शासनाने तातडीने हस्तक्षेप करून रोजगार सहाय्यकांच्या मागण्या मान्य कराव्यात, प्रलंबित जीआर लागू करावा आणि बंद पडलेली कामे त्वरित सुरू करावीत, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांची आर्थिक अवस्था आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सायं. दैनिक सार्व मंथन नवी दिशा, नवी आशा

हे पत्रक मुद्रक, मालक, प्रकाशक **अनिल गंगाधर कोळसे** यांनी यांच्या **स्वराज प्रेस ॲण्ड प्रिटींग येथे ५९३, राहुरी बु।, ता. राहुरी, जि. अहमदनगर (महा) येथे छापून कोळसे दुबीचा मळा, व्यंकोबा मंदीर परिसर, राहुरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर ४१३ ७०५, (महा.)** येथे प्रकाशित केले. संपादक अनिल गंगाधर कोळसे सदर अंकात प्रकाशित झालेल्या लेख बातम्यांच्या मजकूराशी संपादक सहमत असेलच असे नाही. न्यायालयीन वाद–विवाद राहुरी न्याय कक्षेअंतर्गत (खाजगी वितरणासाठी) मुद्रणीय दोष संभवणीय.
RNI No. MAHMAR/2016/72596